प्रा. डॉ. जयसिंगराव पवार
इतिहास संशोधक, कोल्हापूर
मा. मधुसुदन मोहिते
ब्रह्मपुरी, रहिमतपूर
मा. सौ. भारती मधुसुदन मोहिते पाटील
या माझ्या लेखणीस पाठबळ देणाऱ्या
सुहृदयींना...

दैवत



क्रांतिसिंह नाना पाटील

# प्रकरण पहिले

१५ ऑगस्ट १९४७ साली आपला भारत देश इंग्रजांच्या दीडशे वर्षांच्या गुलामगिरीतून मुक्त झाला. इंग्रज व्यापार करायला या देशात आले आणि या देशाचे मालक बनले. त्यांनी कच्चामाल म्हणून आपल्या देशातील संपत्ती त्यांच्या देशाकडे वळवली. देशाची फार मोठी लूट केली. शहाण्या लोकांच्या ध्यानात ही गोष्ट आली. देशाला स्वातंत्र्य मिळावे म्हणून काही माणसे प्रयत्न करू लागली. संपूर्ण भारत देशात सातारा जिल्हा या स्वातंत्र्याच्या लढाईत अग्रेसर राहिला. मोठी क्रांतीच या जिल्ह्यात घडली.

आयुष्याला वेगळे वळण देणाऱ्या गोष्टी अचानक वाट्याला येतात. अंगी असणाऱ्या क्षमतांना आकार देण्याचे काम त्या करतात. छत्रपती शिवाजी महाराजांनी जी देशप्रेमाची स्फूर्तीची जादू इथल्या माणसामाणसांच्या मनात पेरली आहे. ती राखेत असलेल्या विस्तवासारखी इथल्या माणसांच्या मनात लपून आहे. राख बाजूला झाली तर विस्तव केव्हा पेट घेईल हे सांगता येत नाही. तशी सातारा जिल्ह्यातील माणसे केव्हा कशी पेटून उठतील, हेही सांगता येत नाही.

क्रांतिसिंह नाना पाटील या माणसांच्या शब्दातील जादूने हा सातारा जिल्हा १९४२ च्या स्वातंत्र्यलढ्यात पेटून उठला. इथे प्रतिसरकार स्थापन केले. इंग्रज सरकारची झोप उडवली. इंग्लंडच्या पार्लमेंटच्या सभेत 'हा कसला सातारा तिखट जिल्हा आहे', अशी विचारणा झाली.

क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या विचारांना कृतीची, कर्तृत्वाची, गुणवत्तेची, चारित्र्याची जोड देऊन, ज्यांनी झोपलेल्या माणसाला जागे केले, जो जागा आहे त्याला उठवून बसवले. जो बसला आहे त्याला उभे केले, चालायला आणि धावायला लावले ते व्यक्तिमत्त्व म्हणजे सातारा क्रांतीचे अग्रणी, स्वातंत्र्याच्या प्रतिसरकारचे फिल्ड मार्शल क्रांतिसिंहाच्या विचारातील विस्तवाला प्रज्वलित करणारे महात्मे या देशाचे भारतरत्न डॉ. जी. डी. (बापू) लाड.